# कामगार–विरोधी, लोक–विरोधी स्मार्ट वीज मीटरचा एकजुटीने विरोध करा!


## विविध कामगार, शेतकरी आणि सार्वजनिक संघटनांचे आवाहन



## स्मार्ट मीटरचा विरोध करा!






## स्मार्ट मीटरचा विरोध करा!



# वीज ग्राहकांनी आणि विद्युत क्षेत्रातील कामगारांनी एकजुटीने स्मार्ट मीटरचा विरोध का करावा

केंद्र सरकारने 2025 पर्यंत देशभरात 25 कोटी प्री-पेड स्मार्ट वीज मीटर बसवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाच्या घोषणेने विद्युत क्षेत्रातील कामगारांमध्ये आणि ग्राहकांमध्ये विविध चर्चांना सुरुवात झाली आहे. वीज पुरवठ्याची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि किफायतशीरपणा सुधारणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचा सरकारचा दावा आहे. काही ग्राहकांना व कामगारांना याचा फायदा होईल असे जरी वाटत असले तरी त्यांतील अनेकांचा या योजनेला विरोध आहे.

## स्मार्ट वीज मीटर म्हणजे काय?

- स्मार्ट मीटर हे एक असे उपकरण आहे ज्याद्वारे, वीज वापराबद्दल, उपभोक्ता आणि वीज पुरवठादार यांच्यात द्वि–मार्गी संप्रेषण होऊ शकते. एका दिवसात कुठल्याही कालावधीत किती वीज वापरली हे उपभोक्ता बघू शकतो. असा दावा केला जातो की यामुळे, ग्राहक वीज वापराचे नियोजन करून एकूण वीज वापर कमी करू शकतात.
- मोबाईल फोनवर वापरता येईल असे ॲप वीज पुरवठादार तयार करू शकतात ज्याचा वापर करून ग्राहकांना, वापरलेली वीज, पेमेंट, शिल्लक रक्कम इ. बद्दल माहिती मिळू शकते.
- स्मार्ट मीटर लावल्यामुळे, दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेसाठी वीज पुरवठादार ग्राहकांना वेगवेगळे वीजदर आकारू शकतात. याचाच अर्थ **मागणीवर आधारित बदलती किंमत** – जेव्हा मागणी जास्त असते तेव्हा उच्च दर, म्हणजेच बहुतेक सर्व उपभोक्त्यांसाठी सामान्यतः रात्रीसाठी उच्च दर. याला ‘टाइम ऑफ डे’ (ToD) दर प्रणाली म्हणतात.

- स्मार्ट मीटर मुळे, पुरवठादार उपभोक्त्यांकडून वीज वापरासाठी आगाऊच पैसे मागू शकतात – म्हणजे **प्री.पेड पुरवठा**. जेव्हा आगाऊ भरलेली रक्कम संपेल तेव्हा वीज पुरवठा आपोआप खंडित होईल. त्यासाठी कोणालाही प्रत्यक्ष येण्याची गरज नाही.

काही कार्यकर्त्यांच्या टीमने, या योजनेचा तपशील तसेच त्या योजनेबद्दलचे दावे आणि प्रतिदावे समजून घेण्यासाठी अभ्यास केला. त्या योजनेची नमूद केलेली उद्दिष्टे काय आहेत? खरी उद्दिष्टे वेगळी आहेत का आणि असल्यास ती काय आहेत? प्रकल्पाचा फायदा कोणाला होणार आणि त्यामुळे कोणाचे नुकसान होणार? कामगार, ग्राहक आणि वितरण कंपन्यांवर त्याचा काय परिणाम होईल? स्मार्ट मीटरसाठी निधी कोण देणार आणि खर्च कसा व कोणाकडून वसूल केला जाईल?

## अभ्यासाचे निष्कर्ष :

1. मोठ्या खाजगी कंपन्यांच्या (कॉर्पोरेट्सच्या) ज्या मागण्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी स्मार्ट मीटरचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

2. वीज वितरणाचे आधीच खाजगीकरण झाले असो किंवा नासो, स्मार्ट मीटर हे ग्राहक आणि कामगारांच्या हिताच्या विरोधात आहेत.

3. वीज क्षेत्रातील सर्वात फायदेशीर विभागांचे आणखी खाजगीकरण करण्यासाठी स्मार्ट मीटर प्रकल्प हे एक पाऊल आहे.

4. 1991मध्ये काँग्रेस सरकारने सुरू केलेल्या खाजगीकरण आणि उदारीकरणाद्वारे जागतिकीकरणाच्या धोरणाशी हा प्रकल्प सुसंगत आहे. या धोरणाची अंमलबजावणी तेव्हापासून आजपर्यंत सर्व केंद्र सरकारांनी केली आहे.

5. कामगार आणि ग्राहकांना स्मार्ट मीटरमुळे फायदा होईल असा दावा करून, सरकार नेहमीप्रमाणेच त्यांना फसवण्याचा प्रयत्न करत आहे.

6. वास्तविक पाहता, पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी लोकांचा पैसा खर्च करून त्या मोठ्या कॉर्पोरेट्सना वापरण्यासाठी आणि त्यातून जास्त नफा कमवण्यासाठी देण्याची ही योजना आहे.

7. या प्रकल्पामुळे कामगार आणि ग्राहक दोघांचाही फायदा होण्याऐवजी त्यांचे अनेक प्रकारे नुकसान होईल आणि म्हणूनच स्मार्ट मीटर प्रकल्पाचा एकजुटीने विरोध करणे आवश्यक आहे!

## ज्या भागात विजेचे खाजगीकरण केले गेले आहे तेथील अनुभव

देशातील काही प्रमुख शहरांमध्ये वीज वितरणाचे आधीच खाजगीकरण करण्यात आले आहे. उदाहरणार्थ, दिल्लीत टाटा समूह, मुंबईत टाटा आणि अदानी समूह, कोलकात्यात गोएंका समूह, अहमदाबादमध्ये टोरेंट समूह इत्यादी. टाटा समूह ओडिशाच्या एका भागात वीज वितरणदेखील करतो. काही शहरांमध्ये, खाजगी मक्तेदार कंपन्या सरकारी मालकीच्या वितरण कंपनीची (Discomची) फ्रँचायझी म्हणून काम करत आहेत आणि बिलिंग आणि वसुलीसाठी जबाबदार आहेत, उदा. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कळवा, मुंब्रा आणि दिवा येथे टोरेंट समूह.

सरकार व खाजगी कंपन्या जरी ग्राहकांना खाजगी वितरणाचा फायदा झाला असा दावा करतात, तरी प्रत्यक्षातमात्र मुंबईतील ग्राहकांना खाजगी वितरणाचा कोणताही फायदा झालेला नाही. याउलट तेथील विजेचे दर, देशात सर्वाधिकांपैकी आहेत. वितरणातील स्पर्धेमुळे वीज स्वस्त होऊन ग्राहकांना फायदा होईल, असा सरकारचा दावा आहे. परंतु, मुंबईतील ग्राहकांच्या अनुभवावरून असे दिसून येते की, मुंबईत जरी टाटा आणि अदानी या दोन खासगी मक्तेदार कंपन्या कार्यरत असल्या तरी ग्राहकांना मात्र फायदा झालेला नाही. दरमहा 300 युनिट्सपर्यंतच्या वापरासाठी दर दुप्पट करण्याची

खाजगी वितरक टाटा याची मागणी अंशतरू मान्य करण्यात आली आहे व म्हणून खरे तर मुंबईतील लहान ग्राहकांचे अधिक हाल होतील.

**फ्रँचायझी यंत्रणा असलेल्या भिवंडी, कळवा, मुंब्रा इत्यादी भागातील लोकांचा अनुभव अतिशय विदारक आहे.**

वितरणाचे खाजगीकरण झाल्यानंतर लगेचच, पूर्वीच्या सर्व मीटरांच्या जागी, म्हणजे जुन्या किंवा अलीअडेच बसवलेल्या मीटरांच्या जागी, नवीन मीटर बसवण्यात आले. बहुतेक रहिवाशांचे म्हणणे आहे की हे मीटर जास्त जलद धावतात आणि त्यांना आधीच्या मानाने 1.5 ते 2 पट जास्त बिले भरावी लागतात. काही रहिवाशांना पूर्वीच्या रु. 400 किंवा रु. 500च्या रकमेऐवजी हजारो रुपयांची अत्यंत फुगलेली बिले दिली जातात.

टोरंट कंपनी वीजचोरीचा खोटा आरोप करून ग्राहकांना दंड करते. बिल वसुलीसाठी गुंड पाठवण्यात येतात.

बिलाबाबत तक्रार असल्यास त्यांना आधी पैसे भरण्यास सांगितले जाते. तक्रारीचे निवारण होईलच याची शाश्वती नाही. कुठलीही पूर्वसूचना न देता सर्रासपणे वीज कापली जात आहे.

वीजपुरवठा अत्यंत बेभरवशाचा झाला आहे. काही वेळा रात्रीच्या वेळीही तासनतास वीजपुरवठा खंडित होतो. टोरेंटला फोन केल्यावर तोच जुना रेकॉर्डेड मेसेज ऐकू येतो.

फ्रँचायझी यंत्रणेला दहा वर्षे उलटून गेल्यानंतरही भिवंडीतील लोक फ्रँचायझी व्यवस्था रद्द करण्याची आणि डिस्कॉमला (महावितरणाला) वितरक म्हणून पुन्हा नेमण्याची मागणी करत आहेत.

केंद्र सरकारची स्मार्ट मीटर योजना डिस्कॉम्सद्वारे वीज पुरवठा केलेल्या भागात राबविण्यात येत असताना, खाजगी वितरण कंपन्यादेखील त्यांच्या अखत्यारीतील विभागात स्मार्ट मीटर बसविण्यास पुढे सरसावत आहेत. त्यांना त्याद्वारे आगाऊ पैसे गोळा करून, बिलिंग आणि संकलनाचा खर्च कमी करून, तसेच बिल वसुलीचे काम करत असलेल्या कामगारांची संख्या कमी करून स्वतःचा नफा वाढवायचा आहे. कमी झालेल्या खर्चाचे फायदे कधीही ग्राहकांना दिले गेले नाहीत आणि कधी दिलेही जाणार नाहीत.

**प्री–पेड स्मार्ट मीटर योजना ग्राहकांच्या हिताची नाही, मग ते सरकारी वितरण कंपन्यांचे ग्राहक असोत किंवा खाजगी मक्तेदार कंपन्यांचे.**

# प्री-पेड स्मार्ट वीज मीटर प्रकल्पाची पार्श्वभूमी

वीज क्षेत्राच्या जनविरोधी खाजगीकरण कार्यक्रमाची सुरुवात वीजनिर्मितीच्या क्षेत्रात 1990च्या दशकात झाली. आतापर्यंत देशातील अर्ध्याहून अधिक वीजनिर्मिती टाटा, अदानी, जिंदाल, टोरेंट आणि इतर मोठ्या खाजगी कंपन्यांद्वारे केली जात आहे आणि वीज निर्मितीतील खाजगी कंपन्यांचा वाटा सातत्याने वाढत आहे. अक्षय ऊर्जा निर्मिती – सौर, पवन, इत्यादी – पूर्णपणे खाजगी मक्तेदारांच्या हातात आहे. विविध हिंदुस्थानी आणि परदेशी खाजगी कंपन्यांसोबत सरकारी अधिकाऱ्यांनी दीर्घकालीन वीज खरेदी करार केले आहेत. त्यामुळे वीजनिर्मितीत गुंतवणूक करणाऱ्या मक्तेदार भांडवलदारांना प्रचंड खाजगी नफा मिळाला आहे.

वीज निर्मितीच्या खाजगीकरणानंतर, विविध राज्य सरकारांनी वीज वितरणाचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. मुंबई आणि दिल्लीसारख्या काही शहरांमध्ये खाजगी वीज वितरण कंपन्या कार्यरत आहेत. परंतु जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, पुदुचेरी, उत्तर प्रदेश, मध्य

प्रदेश, आणि चंदीगडसारख्या अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत, वीज वितरणाचे खाजगीकरण करण्याचे प्रयत्न कामगारांच्या व ग्राहकांच्या लढाऊ संघर्षांमुळे रोखले गेले आहेत.

## आज कॉरपोरेट्स काय मागण्या करत आहेत

खाजगी वीज मक्तेदार आता संपूर्ण वीज पुरवठा साखळीवर, म्हणजेच निर्मिती, पारेषण आणि वितरण यांवर मालकी आणि नियंत्रण प्रस्थापित करण्यास इच्छुक आहेत.

डिस्कॉम्सच्या (राज्याच्या मालकीच्या वितरण कंपन्यांच्या) मोठ्या प्रमाणावर खाजगीकरणाला अधिक फायदेशीर बनवण्यासाठी विद्युत क्षेत्रातील खाजगी मक्तेदार सरकारला सांगत आहेत की डिस्कॉम्सच्या आर्थिक समस्यांचे त्याने निराकरण करावे. त्यांची इच्छा आहे की सरकारने अशी यंत्रणा बनवावी जिच्या द्वारे सुनिश्चित केले जाईल की त्यांनी पुरवलेल्या विजेची किंमत त्वरित वसूल करून त्यांच्या हाती मिळावी. यासाठी ते अशा मागण्या करत आहेत की,

1. एक अशी प्रणाली तयार करा जेणेकरून वैयक्तिक, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी आणि सरकारी ग्राहकांकडे थकीत बिल राहणारच नाही.

2. विजेवरील सर्व अनुदाने बंद करा. ग्राहकांच्या गटाला दिलेली कोणतीही सबसिडी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) प्रणालीद्वारे असावी. याचा अर्थ प्रत्येक ग्राहकाने सब्सिडी मिळण्यापूर्वी विजेची संपूर्ण किंमत अदा करणे आवश्यक आहे.

3. वीज चोरी आणि वीज वितरण व्यवस्थेतील वीज गळती कमी करा, जेणेकरुन पुरवलेल्या बहुतेक विजेची किंमत वसूल होईल.

4. सार्वजनिक पैशाने वितरण व्यवस्थेतील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करा जेणेकरून खाजगी कंपन्यांना नूतनीकरणासाठी भांडवल गुंतवावे लागणार नाही.

## सरकारचा प्रतिसाद

केंद्र सरकारने 20 जुलै 2021 रोजी कार्यान्वित केलेल्या, सुधारित वितरण क्षेत्र योजनेवर (RDSSवर) 3,03,758 कोटी रुपये खर्च करण्याची योजना आहे. या योजनेचा एक भाग म्हणून, कृषी क्षेत्रातील ग्राहकांच्या व्यतिरिक्त इतर ग्राहकांसाठी 25 कोटी स्मार्ट मीटर बसविण्यात येतील.

RDSS च्या इतर घटकांसह प्री-पेड स्मार्ट मीटरिंग योजना ही कॉर्पोरेट्सच्या सर्व मागण्या पूर्ण करते. यामुळे सार्वजनिक वीजवितरण व्यवसाय, जो आज सर्वसाधारणत: तोट्यात आहे, तो फायदेशीर होईल. तसेच डिस्कॉम्सने विकत घेतलेल्या वीजेसाठी देय देण्यास उशीर झाल्यामुळे वीजनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना (Gencosना) येणाऱ्या अडचणी यामुळे दूर केल्या जातील.

मीटर्स प्री-पेड करून, वीज पुरवठादाराला खात्री दिली जाते की ज्यासाठी आगाऊ पैसे दिले गेले आहेत तेवढीच वीज पुरविली जाईल. वीज पुरवठा खंडित करण्यासाठी एखाद्या व्यक्तीने प्रत्यक्ष येण्याची गरज नसेल, तर त्याऐवजी वीज पुरवठा दूरस्थपणे बंद केला जाऊ शकतो.

वितरण पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण होईल आणि वीजगळती आणि चोरीमुळे होणारे नुकसान कमी होईल. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, स्मार्ट मीटरिंग योजनेव्यतिरिक्त RDSS मध्ये आणखी एक घटक आहे.

केंद्र सरकार पायाभूत सुविधांच्या सुधारणा प्रकल्पांसाठी 60% निधी देईल परंतु त्यासाठी डिस्कॉमला त्याची वितरण व्यवस्था मजबूत

करण्यासाठी आणि त्याची कामगिरी सुधारण्यासाठी कालबद्ध तपशीलवार कृतीआराखडा तयार करणे आवश्यक आहे. पूर्व-पात्रता निकष पूर्ण झाल्यावर आणि तोटा कमी करण्याच्या योजनेनुसार पावले उचलली गेली असली तरच तो निधी केंद्र सरकार देईल (RDSS आणि स्मार्ट मीटर योजनेचा तपशील शेवटी परिशिष्टात देण्यात आला आहे.) **अशाप्रकारे, सार्वजनिक पैशांचा वापर वितरण पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी केला जाईल आणि खाजगी कंपन्या त्या वापरतील.**

स्मार्ट मीटर बसवण्यासाठी, सरकार, सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) पद्धतीचा आग्रह धरत आहे, या वस्तुस्थितीमुळे खरे उद्दिष्ट अधिक स्पष्ट होते – खाजगी कॉरपोरेट्ससाठी वीज वितरण आकर्षक बनवणे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या दाव्यांनी फसवणूक करून घेणे ग्राहक आणि वीज क्षेत्रातील कामगारांना परवडणारे नाही.

**डिस्कॉम्सच्या सर्वात फायदेशीर कामकाजाच्या खजगीकरणाचा मार्ग मोकळा करण्यासाठी आता स्मार्ट मीटर बसवण्याचे काम हाती घेतले जात आहे.**

# वीज क्षेत्राचे खाजगीकरण लोकांच्या आणि कामगारांच्या हिताचे का नाही?

- आजच्या काळात आणि युगात वीज पुरवठा मिळणे ही सर्व मानवांची अत्यावश्यक गरज आहे. तो एक सार्वत्रिक अधिकार आहे. त्यामुळे सर्वांना परवडणाऱ्या दरात पुरेसा आणि विश्वासार्ह वीजपुरवठा सुनिश्चित करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

- वीज क्षेत्राचे खाजगीकरण वीजेला नफ्याचे स्त्रोत बनवते, ज्यामुळे आपल्या देशातील अनेकांना न परवडणाऱ्या वीज दरांचा सामना करावा लागेल.

- हे राज्याने आपले कर्तव्य झटकून टाकण्यासारखे आहे. सर्व कुटुंबांना किफायतशीर दरात विश्वसनीय विद्युत पुरवठा मिळण्याच्या मूलभूत अधिकाराचे हे उल्लंघन आहे.

- खाजगी कॉरपोरेट्स फक्त अशाच क्षेत्रांना वीज पुरवण्यास प्राधान्य देते जे सर्वात फायदेशीर आहेत (फायदेशीर ग्राहकांची निवड करते). त्यांना लहान ग्राहकांना किंवा दूरवरच्या भागातील ग्राहकांना किंवा पाणीपुरवठा इ. सेवांसारख्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात स्वारस्य नाही. या ग्राहकांना सरकारी मालकीच्या डिस्कॉम्सकडून सेवा मिळत राहावी अशी त्यांची इच्छा आहे. जर सर्व फायदेशीर ग्राहक खाजगी कॉर्पोरेट्सनी काढून घेतले आणि सेवा पुरवण्यासाठी अतिरिक्त खर्च लागणाऱ्या ग्राहकांना डिस्कॉमसाठी सोडले तर डिस्कॉम्सचे नुकसान वाढेल आणि लोकांवर जास्त कर लादून ते भरून काढण्यात येइल.

- डिस्कॉम्स सध्या जागा आणि अंतर विचारात न घेता, ज्याला हवी असेल त्यांना वीज पुरवठा करण्यास बांधील आहेत. डिस्कॉम्सच्या भूमिकेमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात वीज पोहोचली आहे. खाजगी कंपन्यांवर असे कोणतेही बंधन नाही. याबाबतीत आतापर्यंत केलेली प्रगती खाजगीकरणामुळे नाकारली जाईल.

- खाजगीकरणामुळे सर्रास अनेक कामगारांना नोकरीवरून काढून टाकण्यात येते. कायमस्वरूपी नोकऱ्यांच्या जागी एक तृतियांश ते एक चतुर्थांश पगारावर कंत्राटी कामगार नेमण्यात येतात. सुरक्षितता धोक्यात येते. नोकरीची सुरक्षितताही गमावली जाते. अशा प्रकारे खाजगीकरणामुळे केवळ सध्याच्या कामगारांचेच नव्हे तर भावी पिढ्यांचेही नुकसान होईल.

**म्हणूनच वीज क्षेत्राचे खाजगीकरण हे लोकविरोधी, कामगारविरोधी आणि समाजविरोधी आहे.**

## स्मार्ट मीटर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे वीज ग्राहकांचे का आणि कसे नुकसान होईल

वीज पुरवठ्याची गुणवत्ता आणि विश्वासार्हता सुधारणे, हा मीटर बसवण्याचा उद्देश असल्याचा सरकारी प्रवक्ते दावा करतात. त्यांचा दावा आहे की स्मार्ट मीटर ग्राहकांना त्यांच्या वीजवापराचे नियोजन आणि नियंत्रण करण्यास सक्षम करतील आणि त्यामुळे त्यांचे वीज बिल कमी होईल.

पण देशाच्या विविध भागांतील ग्राहक आणि वीज कर्मचारी मात्र प्री.पेड स्मार्ट वीज मीटर बसवण्यास विरोध करत आहेत. ग्राहकांना अधिक लुटणे व शिवाय वीज वितरणाच्या खाजगीकरणाचा मार्ग मोकळा करणे, हेच यामागील खरे उद्दिष्ट आहे, हे त्यांचे म्हणणे आहे. ग्राहकांचा बळी देऊन वीज क्षेत्रातील कॉर्पोरेट्सचा नफा जास्तीत जास्त वाढवण्यात स्मार्ट मीटर मदत करतील.

खेड्यांतील लोक विरोध करत असल्याचे कारण म्हणजे, त्यांना भीती आहे की, एकदा स्मार्ट मीटर बसवले की, शेतीसाठी असणारी वीज पुरवठ्यावरील सर्व अनुदाने काढून टाकली जातील.

ज्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविले आहेत तेथील ग्राहकांना त्यांची अवस्था अधिकच वाईट झाल्याचे अनुभवास येत आहे. देशाच्या अनेक भागांत वीजपुरवठा प्री.पेड करण्यात आला आहे. त्यांना आता वीज वापरण्यापूर्वीच पैसे भरण्याची सक्ती केली जात आहे. बिहारमधील एका ठिकाणी 13,000 ग्राहकांना प्री.पेड स्मार्ट मीटरिंग सिस्टममध्ये बिघाड झाल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा खंडित झाल्याचे आढळले. इतर काही ठिकाणी प्री.पेड खाती रिचार्ज झाल्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत होण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी लोक करत आहेत. स्मार्ट मीटरची किंमतसुद्धा बिलातून वसूल केली जाणार असल्याने वाढणाऱ्या बिलामुळे अनेक ठिकाणी ग्राहक हे मीटर बसविण्यास विरोध करत आहेत.

ग्राहकांना वीज वापरण्यापूर्वी आगाऊ पैसे भरण्यास सांगितल्याने प्री-पेड प्रणाली लागू झाल्यानंतर हजारो कोटी रुपये खाजगी वीज मक्तेदार कंपन्यांना वापरासाठी उपलब्ध होतील.

Gencos (विद्युतनिर्मिती कंपन्या) त्यांना वीज पुरवठा करण्यापूर्वीच डिस्कॉमकडे आगाऊ पैसे देण्याची मागणी देखील करू शकतील! **आपण हे लक्षात घेतले पाहिजे, की सुमारे 50: वीजनिर्मिती आधीपासूनच खाजगी कंपन्यांच्या हातात आहे!**

तांत्रिक आणि व्यावसायिक तोटा कमी करणे आणि वीज वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता सुधारणे, ही RDSS ची उद्दिष्टे जरी इष्ट असली तरी, या सुधारणेचा फायदा वीज ग्राहकांना मिळणार नाही, ही खरी समस्या आहे. हे मागील अनुभवावरून दिसून येते. देशाचा AT&C तोटा 2011–12 मधील सुमारे 28 टक्क्यांवरून 2021–22 मध्ये 17 टक्क्यांवर आला आहे, परंतु या काळात वीजदर मात्र वर्षानुवर्षे वाढलेच आहेत. वीज निर्मिती आणि वितरण कंपन्यांनी स्वतःचा नफा वाढवण्यासाठी, या सुधारणेतून झालेला फायदा पूर्णपणे स्वतःच्या खिशात घातला आहे.

## स्मार्ट मीटरचा ग्राहकांवर कसा दुष्परिणाम होईल :

1. **आगाऊ देयक :** सर्व स्मार्ट मीटर प्री-पेड असणे अपेक्षित आहे. वीज वापरण्यापूर्वीच ग्राहकांना आगाऊ पैसे द्यावे लागतील. यामुळे लोकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल. शिल्लक रक्कम संपल्यावर वीज पुरवठा आपोआप खंडित होईल. आणि जर वीज पुरवठा खंडित होऊ द्यायचा नसेल, तर त्यांना वीज वापराचा मागोवा ठेवावा लागेल व शिल्लक रक्कम संपण्यापूर्वी त्यांचा मीटर रिचार्ज करावा लागेल.

2. **ToD दरप्रणाली (tariff system) :** स्मार्ट मीटरमुळे दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या दरांची आकारणी करता येते, ज्याला ToD (टाइम ऑफ द डे) दरप्रणाली म्हणून ओळखले जाते. याचा अर्थ मागणीवर आधारित डायनॅमिक दरप्रणाली – म्हणजे मागणी जास्त असताना उच्च दर आणि मागणी कमी असताना कमी दर. सरकारच्या घोषणेनुसार, 8 तासांमध्ये सूर्यप्रकाश असताना वीज दर नियमित दरांपेक्षा 10–20% कमी असतील आणि सर्वाधिक वापराच्या वेळेत 10–20% जास्त असतील. एप्रिल 2025 पासून सर्व ग्राहकांसाठी ToD दर लागू करण्याची योजना आधीच जाहीर करण्यात आली आहे.

   दर जास्त असेल, तेव्हा ग्राहक वीज वापर कमी करू शकतील व यामुळे ग्राहकांचे वीज बिल कमी होण्यास मदत होईल, असा सरकारचा दावा आहे. हे खोटे आहे.

   जेव्हा प्रत्येकजण संध्याकाळी/रात्री घरी असेल, तेव्हा अर्थातच वीजवापर जास्त होईल. त्यामुळे ToD दर लागू झाल्यावर ग्राहकांची बिले कमी होण्याऐवजी उलट वाढतील.

3. **वीज दरांत वाढ :** RDSSने वीज दर निश्चित करण्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. वीज दर ठरवताना सर्व खर्च विचारात घेतले जातील. कोणताही खर्च पुढे ढकलला जाऊ शकणार नाही. प्रत्येक वर्षी दर सुधारित करणे आवश्यक असेल. ग्राहकांच्या कोणत्याही श्रेणीला

अनुदान द्यायचे असल्यास, अनुदानाची रक्कम डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) प्रणालीद्वारे दिली जाणे आवश्यक असेल, जसे LPG सिलिंडरवर अनुदान देताना करण्यात आले होते.

या सर्व अटी लागू झाल्यानंतर, बहुतेक ग्राहकांसाठी दर वाढतील. दरांचे कोणतेही क्रॉस सब्सिडाइझेशन होणार नाही, म्हणजे काही ग्राहकांसाठी उच्च दर आणि गरीब ग्राहकांसाठी कमी दर, असे असणार नाही. जरी राज्य सरकारने DBTच्या माध्यमातून ग्राहकांच्या एखाद्या घटकाला अनुदान द्यायचे ठरविले, तरीही LPG सिलिंडरच्या अनुदानाप्रमाणेच हे अनुदानदेखील हळूहळू नाहीसे होईल.

अनेक ग्राहकांना वीज परवडणार नाही.

4. **स्मार्ट मीटरची किंमत आणि मर्यादित आयुष्य :** जरी सुरुवातीला ग्राहकांना स्मार्ट मीटर आणि इन्फर्मेशन अँड मॉनिटरिंग सिस्टमची संपूर्ण किंमत भरावी लागणार नसली, तरी वीजबिलाचा एक भाग म्हणून ती वर्षानुवर्षे वसूल केली जाईल. स्मार्ट मीटरचे 7–10 वर्षांचे मर्यादित आयुष्य असल्याने ते बदलण्याचा भारही ग्राहकांवर पडेल.

5. **तक्रार निवारण :** स्मार्ट मीटरिंग प्रणालीचे व्यवस्थापन खाजगी कंपनी करणार असल्याने, ग्राहक आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी त्यांच्या मेहेरबानीवर अवलंबून राहतील. बिलिंग आणि कलेक्शनसाठी फ्रँचायझी म्हणून ज्या ज्या ठिकाणी खाजगी कंपन्या आणल्या गेल्या आहेत, तिथे ग्राहकांना तक्रार निवारणाच्या बाबतीत अतिशय कटू अनुभव आला आहे.

**आजच्या जीवनातील वीज ही एक मूलभूत गरज आहे. स्मार्ट मीटरिंग योजना आपल्या देशातील अनेक लोकांना विजेपासून वंचित करेल. एकदा का तिचे पूर्ण खाजगीकरण झाले, की वीज हे एक नफेखोरीचे साधन बनेल.**

# वीज क्षेत्रातील कामगारांना याचा कसा फटका बसेल?

वीज क्षेत्रातील कामगारांना याचा दुहेरी फटका बसेल, प्रथम, वीज वापरकर्ते असल्याच्या नात्याने, कारण इतर ग्राहकांप्रमाणेच त्यांनाही प्रचंड वीज बिल भरावे लागेल आणि दुसरे म्हणजे, डिस्कॉम्सच्या खाजगीकरणामुळे कामगार म्हणून.

वीज कामगार जेव्हा थकीत बिले गोळा करण्यासाठी किंवा थकीत बिलांमुळे वीज पुरवठा खंडित करण्यासाठी जातात तेव्हा त्यांना ग्राहकांच्या रोषाला तोंड द्यावे लागते. प्री.पेड स्मार्ट मीटर बसविल्याने त्यापासून कामगारांचा बचाव होईल म्हणून वीज कामगारांनी प्री.पेड स्मार्ट मीटर बसवण्याला पाठिंबा द्यावा असे सरकार सांगत आहे. **परंतु, स्मार्ट मीटरिंग प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर यातील अनेक कामगारांना लगेच नोकरी गमवावी लागण्याची शक्यता असल्याने हा फायदा अल्पकाळच टिकण्याची शक्यता आहे. संपूर्ण बिल आकारणी आणि संकलन तसेच मीटरिंगशी संबंधित सर्व कामे स्मार्ट मीटर बसवणाऱ्या खाजगी कंपनीद्वारे हाताळली जातील.** फक्त तामिळनाडू या एकाच राज्यात, युनियन्सच्या अंदाजानुसार, सुमारे 20,000 कामगारांवर याचा दुष्परिणाम होईल.

डिस्कॉम्सचे खाजगीकरण झाल्यास वीज क्षेत्रातील कामगारांना आणखी मोठा तडाखा बसेल. जिथे जिथे खाजगीकरण झाले आहे तिथे तिथे नोकरीची सुरक्षितता नष्ट झाली आहे, कायमस्वरूपी नोकऱ्यांची जागा मोठ्या प्रमाणात कंत्राटी नोकऱ्यांनी घेतली आहे आणि कामगारांना मिळणाऱ्या फायद्यांमध्ये घट झाली आहे असाच अनुभव आहे. एअर इंडियाच्या खाजगीकरणातून मिळालेले धडे विसरणे सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांना परवडणारे नाही. तेव्हा एअर इंडियाच्या कामगारांना खाजगीकरणानंतर केवळ एक वर्षासाठी रोजगाराच्या विद्यमान अटींची हमी देण्यात आली होती. टाटा समूहाने एअर इंडिया ताब्यात घेतल्यानंतर एका वर्षात तीन स्वैच्छिक सेवानिवृत्ती योजना (VRS) आणल्या. खासगी कंपन्यांमध्ये ही VRS किती 'स्वैच्छिक' असते हे तर कामगारांना ठाऊकच आहे!

प्री-पेड स्मार्ट मीटरमुळे बिलिंगशी संबंधित असलेल्या नोकऱ्या मोठ्या प्रमाणात संपुष्टात येतील, त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांच्या अनेक संघटना या योजनेला विरोध करत आहेत, यात काही नवल नाही.

वीज कामगारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी करण्यात आलेला आणखी एक युक्तिवाद असा आहे की, प्री-पेड स्मार्ट मीटर बसवल्यास वीज चोरी कमी होईल आणि त्यामुळे त्यांच्या डिस्कॉमचे (वितरण कंपनीचे) आर्थिक आरोग्य सुधारेल.

पण डिस्कॉम्सच्या खराब आर्थिक स्थितीला वीज क्षेत्रातील कामगार जबाबदार नाहीत. तर केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळेच डिस्कॉम्सचे नुकसान झाले आहे. त्यांना डिस्कॉम्स आणि ग्राहक या दोघांचाही बळी देऊन खाजगी जेनकोंसाठी (जनरेशन कंपन्यांसाठी) अत्यंत अनुकूल अटींवर वीज खरेदी करार (PPAs) करण्यास भाग पाडले गेले आहे. या PPAs अंतर्गत, जरी डिस्कॉम्सनी त्यांच्याकडून वीज घेतली नसली तरी त्यांना जेनकोंना पैसे द्यावे लागतात!

## वीज म्हणजे नफा कमविण्याचे साधन होता कामा नये!

वीजपुरवठा फायदेशीर असला पाहिजे, या विचारालाच आपण कामगारांनी आणि ग्राहकांनी आव्हान दिले पाहिजे. **वीज, वाहतूक, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छता सेवा यांसारख्या मूलभूत सेवांना नफ्याचे साधन मानले जाऊ शकत नाही!**

सर्वांना मूलभूत सेवा **परवडणाऱ्या दरात** मिळाव्यात, हे सुनिश्चित करण्याची आपली जबाबदारी सरकार झटकत आहे. **सरकार कर गोळा करते, ते सर्वांसाठी चांगले जीवन सुनिश्चित करणे हे सरकारचे कर्तव्य आहे, म्हणूनच. अप्रत्यक्ष कर प्रत्येक व्यक्ती भरत असते, मग ती कितीही गरीब असो. अप्रत्यक्ष कर हा करांचा सर्वात मोठा भाग आहे.**

या देशातील एकही नागरिक विजेपासून वंचित राहता कामा नये, हे सुनिश्चित करणाऱ्या धोरणांचा आग्रह आपण कामगारांनी धरला पाहिजे.

वीज ही आजच्या जीवनाची एक मूलभूत गरज आहे पण स्मार्ट मीटरिंग योजनेमुळे आपल्या देशातील अनेक लोक विजेपासून वंचित राहतील. **जबाबदार नागरिक म्हणून आणि "एकावर हल्ला, हा सर्वांवर हल्ला आहे!" या कामगार वर्गाच्या आंतरराष्ट्रीय आवाहनाशी प्रामाणिक राहून, आपण कामगारांनी आपल्या सर्व हिंदुस्थानी बांधवांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे.**

हे स्पष्ट आहे की, प्री-पेड स्मार्ट मीटरिंग स्कीम आणि रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम (RDSS) च्या इतर घटकांचे खरे उद्दिष्ट खाजगीकरणासाठी वीज वितरणाला आकर्षक बनवणे हेच आहे. केंद्र व राज्य सरकारच्या दाव्यांमुळे फसणे ग्राहक आणि वीज क्षेत्रातील कामगारांना परवडणारे नाही.

स्मार्ट मीटर योजना हे आणखी काही नसून वीज ग्राहकांना पिळून खाजगी कोर्पोरेट्स चे नफे वाढव्ण्याच्या दिशेने टाकलेले एक 'स्मार्ट' पाऊल आहे.

## स्मार्ट मीटर योजना खाजगीकरणाचा विरोध कमकुवत करण्यासाठी आहे

वीज वितरणाचे खाजगीकरण करण्याच्या उद्देशाने वीज दुरुस्ती विधेयक (इलेक्ट्रिसिटी अमेंडमेंट बिल – EAB) मंजूर करण्याचे केंद्र सरकारने वारंवार केलेले प्रयत्न हाणून पाडण्यात, वीज क्षेत्रातील कामगार, शेतकरी तसेच इतर संघटनांच्या कामगारांना त्यांच्या एकजुटीच्या लढ्यामुळे अद्यापतरी यश आले आहे. EAB मागे घेणे ही शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या संघर्षातील प्रमुख मागण्यांपैकी एक होती. केंद्र सरकारने त्यांना लेखी आश्वासन दिले की त्यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय

EAB संसदेत मांडले जाणार नाही. तरीही सरकार हे विधेयक संसदेत मांडण्यासाठी पुढे सरसावले आहे.

EAB 2022 चा धोका अजून टळलेला नाही. ते संसदेच्या ऊर्जा विषयक स्थायी समितीकडे पाठवले गेले होते, पण आता लोक सभेचा कार्यकाळ संपल्यामुळे ते विधेयक कालबाह्य झाले. परंतु निवडणुकीनंतर नवीन सरकार बनल्यावर पुनरू ते कधीही तेच विधेयक मांडू शकते. संसदेच्या मंजुरीची गरज टाळण्यासाठी, केंद्र सरकार वीज नियमांमध्ये बदल करत आहे आणि खाजगीकरण शक्य करण्यासाठी RDSS सारख्या योजना आणत आहे.

# निष्कर्ष

प्री.पेड स्मार्ट मीटर बसवणे ना वीज क्षेत्रातील कामगारांच्या हिताचे आहे, ना देशातील ग्राहकांच्या हिताचे आहे. त्यात फायदा फक्त जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी आता देशाच्या संपूर्ण वीज व्यवस्थेवर नियंत्रण ठेवू इच्छिणाऱ्या बड्या कॉर्पोरेट्सचा आहे.

वीज क्षेत्राचे खाजगीकरण करण्याच्या विविध प्रयत्नांचा विरोध करण्यासाठी, वीज क्षेत्रातील कामगारांनी नॅशनल कोऑर्डिनेशन कमिटी ऑफ पॉवर एम्प्लॉईज अँड इंजिनिअर्स (NCCOEEE) च्या बॅनरखाली अनुकरणीय एकजूट दाखवली आहे. प्री-पेड स्मार्ट मीटर बसवल्याने विजेच्या सार्वत्रिक वापराच्या अधिकारांवर अंकुश येईल असे NCCOEEE ने म्हटले आहे ते बरोबरच आहे.

**प्रत्येक कामगार आणि ग्राहकाला आपले कसे नुकसान होईल याची जाणीव करून देऊन आणि त्याविरूद्ध संघटित करून, प्री-पेड स्मार्ट मीटर बसवण्याचा सरकारचा हा घातकी प्रयत्न हाणून पाडला पाहिजे!**

## परिशिष्ट

# प्री-पेड स्मार्ट मीटरिंग योजना

1. स्मार्ट मीटरिंग योजना सार्वजनिक–खाजगी–भागीदारी (PPP) द्वारे राबविण्यात येणार आहे. DISCOM ला स्वतः ही योजना लागू करण्यास परवानगी नाही.

2. DISCOMs ने तसे न करण्याचा निर्णय घेतला नाही तर सर्व स्मार्ट मीटर **प्री.पेड** मीटर म्हणून स्थापित केले जातील.

3. खाजगी भागीदार, संपूर्ण मीटरिंग प्रणाली डिझाइन करेल, बांधेल, तिच्यात पैसा गुंतवेल, व तिला चालवेल. ती त्याच्या मालकीची असेल. प्रकल्पाच्या कालावधीच्या शेवटी (समजा १० वर्षे) हा खाजगी भागीदार, संपूर्ण मीटरिंग प्रणाली डिस्कॉमला ट्रान्सफर करेल (DBFOOT). म्हणजेच संपूर्ण प्रकल्प कालावधीत एकूण खर्च (TOTEX) म्हणजे प्रणाली तयार करण्यासाठीचा सर्व भांडवली खर्च (CAPEX) आणि प्रणाली चालविण्याचा म्हणजेच ऑपरेटिंग खर्च (OPEX), देखील खाजगी कंपनी करेल.

4. स्मार्ट मीटरिंग प्रकल्पामध्ये केवळ स्मार्ट मीटरची स्थापनाच नाही तर वापर, बिलिंग, पेमेंट इत्यादींबाबत ग्राहक आणि DISCOMs यांच्यात द्वि–मार्गी संप्रेषण प्रणाली आणि मीटरची संपूर्ण माहिती प्राप्त करण्यासाठी आणि ती संग्रहित करण्यासाठी सॉफ्टवेअरचाही समावेश आहे.

5. योजनेच्या अंतर्गत, वीज फीडर लाईन आणि ट्रान्सफॉर्मर्सकडून येणाऱ्या व जाणाऱ्या लाईन्सवर देखील

स्मार्ट मीटर बसवले जातील जेणेकरून वीज गळती आणि चोरी कुठे होते याचे विश्लेषण करता यावे.

6. खाजगी भागीदाराने केलेल्या भांडवली आणि ऑपरेटिंग खर्चाच्या मोबदल्यात, कराराच्या कालावधीत, डिस्कॉम खाजगी भागीदाराला DISCOM दरमहा प्रतिमीटर फी देईल. अशा प्रकारे दरमहा द्यायची रक्कम क्ैब्ब्ड च्या बँकखात्यातून खाजगी भागीदाराच्या बँकखात्यात आपोआप हस्तांतरित केली जाईल.

7. मीटरच्या किमतीच्या 15% किंवा प्रति मीटर रु. 900, यापैकी जी कमी असेल ती रक्कम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकार डिस्कॉमला निधीच्या स्वरूपात देईल. उत्तर पूर्वेतील राज्ये, डोंगराळ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, यांना ते मीटरच्या किमतीच्या 22.5% किंवा प्रति मीटर रु. 1350, यापैकी जी कमी असेल ती दिली जाईल. प्री.पेड स्मार्ट मीटरिंग योजना लागू करण्यासाठी डिस्कॉम्सला हे प्रोत्साहन देण्यासारखे आहे. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर आणि संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतरच ही प्रोत्साहनपर रक्कम दिली जाईल.
31 डिसेंबर 2023 पर्यंत बसवलेल्या मीटरसाठी प्रोत्साहनपर अधिक रक्कम मिळणार होती.

8. या योजनेच्या घोषित उद्दिष्टांपैकी एक म्हणजे, 2024–25 पर्यंत, संपूर्ण देश पातळीवरील वीज वितरणातील एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक (AT&C) नुकसान 12–15% या पातळीवर आणायचे आहे.

9. शेतीला वीज पुरवठा करणाऱ्या विजेच्या तारा (फीडर्स) इतर तारांपासून वेगळ्या करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा वीज

पुरवण्यासाठी "शेती फीडर्सचे सोलाराइजेशन" अशी RDSS ची संकल्पना आहे. सोलाराइजेशन म्हणजे शेतकऱ्यांना सौरऊर्जेद्वारे निर्माण होणारी वीज पुरवली जाईल.

10. या व्यतिरिक्त RDSS योजनेमध्ये खालील बाबीही सामील आहेत :

– सरकारी विभागांनी **वापरलेल्या विजेचे पैसे तत्परतेने द्यावेत** यासाठी यंत्रणा प्रस्थापित करणे.

– अनुदानित दरावर पुरवठा केलेल्या विजेची योग्यरित्या मोजणी करणे आणि त्याबद्दल डिस्कॉमला **आगाऊ पैसे** देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी एक यंत्रणा तयार करणे. भविष्यात **अनुदान थेट लाभ हस्तांतरण (DBT) यंत्रणेद्वारे प्रदान केले जावे.**

– वीजदर दरवर्षी निश्चित करणे आवश्यक आहेय योग्यपणे केलेला खर्च आणि जो खर्च यात समाविष्ट नाही आणि डिस्कॉमध्राज्य सरकारने द्यायचा आहे, तो वेगवेगळा दाखवणे आवश्यक आहे.

– **संचित आणि चालू आर्थिक नुकसान भरपाईसाठी निधीची योजना** तयार करणे आणि तिचे पालन करणे.

– **डिस्कॉमच्या काही भागात वितरण फ्रँचायझीची व्यवस्था.**

– **DISCOM कर्मचाऱ्यांसाठी कामगिरीवर आधारित बदली करण्याच्या धोरणाची सुरुवात.**

# आवाहन करणाऱ्या संघटनांच्या यादीतील उर्वरित

24. कोयला मज़दूर सभा (HMS),
25. लेबर प्रोग्रेसिव फेडरेशन (डीएमके)
26. लड़ाकू गारमेंट मज़दूर संघ (LGMS)
27. महाराष्ट्र स्टेट बैंक एम्प्लोयीज फेडरेशन (MSBEF)
28. नेशनल फेडरेशन ऑफ इंडियन रेलवेमेन (NFIR)
29. नेशनल फेडरेशन ऑफ पोस्टल एम्प्लोयीज (NFPE)
30. स्टील प्लांट एम्प्लोयीज यूनियन (RINL)

## शेतकरी संघटना

31. ऑल इंडिया किसान खेत मज़दूर सभा (AIKKS)
32. ऑल इंडिया किसान महासभा (AIKM)
33. ऑल इंडिया किसान मज़दूर सभा (AIKMS)
34. ऑल इंडिया किसान सभा (AIKS)
35. भारतीय किसान यूनियन (एकता उगराहां)
36. इंडियन एग्रीकल्चरल वर्कर्स यूनियन (IAWU)
37. कीर्ति किसान यूनियन
38. क्रांतिकारी किसान यूनियन

## लोक संघटना

39. भारतीय महिला फेडरेशन, महाराष्ट्र
40. भिवंडी जन संघर्ष समिति (BJSS)
41. फातिमा शेख स्टडी सर्कल, मुम्ब्रा
42. जमात–ए–इस्लामी हिंद (ठाणे)
43. लोक राज संगठन (LRS)
44. पुरोगामी महिला संगठन (PMS)
45. सर्वहारा जन आंदोलन
46. सर्वहारा जन मोर्चा

# खालील संघटनांचे आवाहन

## वीज कामगारांच्या संघटना

1. नेशनल कॉर्डिनेशन कमिटी ऑफ इलेक्ट्रीसिटी एम्प्लोयीज एंड इंजीनियर्स (NCCOEEE) – बिजली कर्मचारियों और इंजीनियरों के सभी फेडरेशनों का एक व्यापक आधार वाला राष्ट्रीय प्लेटफॉर्म
2. ऑल इंडिया फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिसिटी एम्प्लोयीज (AIFEE)
3. इलेक्ट्रिसिटी एम्प्लाइज फेडरेशन ऑफ इंडिया (EEFI)
4. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन (MSEWF)
5. कर्नाटक पॉवर ट्रांसमिशन कॉर्पोरेशन एम्पलोयीज यूनियन
6. टीएनईबी एम्पलोयीज प्रोग्रेसिव यूनियन

## इतर कामगारांच्या संघटना

7. ऑल इंडिया बैंक एम्पलोयीज एसोसिएशन (AIBEA)
8. ऑल इंडिया कॉन्फेडरेशन ऑफ एससी/एसटी ऑर्गेनाजेशंस (ऑल इंडिया परिसंघ)
9. ऑल इंडिया डिफेन्स एम्पलोयीज फेडरेशन (AIDEF)
10. सर्व हिंद निजीकरण विरोधी फोरम (AIFAP)
11. ऑल इंडिया इन्शुरेंस एम्पलोयीज एसोसिएशन (AIIEA)
12. ऑल इंडिया लोको रनिंग स्टाफ एसोसिएशन (AILRSA)
13. ऑल इंडिया रेलवेमेंस फेडरेशन (AIRF)
14. ऑल इंडिया रेलवे ट्रैकमेंटेनर्स यूनियन (AIRTU)
15. ऑल इंडिया स्टेट गवर्नमेंट एमप्लोयीज फेडरेशन (AISGEF)
16. ऑल इंडिया स्टेशन मास्टर्स एसोसिएशन (AISMA)
17. ऑल इंडिया ट्रेड यूनियन कॉंग्रेस (AITUC)
18. ऑल इंडिया यूनाइटेड ट्रेड यूनियन सेंटर (AIUTUC)
19. बरेली ट्रेड यूनियंस फेडरेशन
20. आईडीबीआई एम्पलोयीज एसोसिएशन (IDBIEA)
21. इंडियन नेशनल ट्रेड यूनियन कॉंग्रेस (INTUC)
22. इंडियन रेलवे सिग्नल एंड टेलीकम्युनिकेशन मज़दूर यूनियन (IRSTMU)
23. कामगार एकता कमिटी (KEC) / मज़दूर एकता कमेटी (MEC) / तोयिलालर ओट्टूमइ इयक्कम (TOI)

**मे 2024; वैयक्तिक वितरणासाठी, ऐच्छिक योगदान**

संपर्क : फोन व वाट्सएप्प – 8454018757; ई–मेल : contact@aifap.org.in